दै. लोकमत दि. ०८/०१/२०२३.

दोन गुन्हे उघडकीस, स्थानिक गुन्हे शाखेसह ग्रामीण ठाण्याची कार्यवाही

# जबरी चोऱ्या करणारे पाच अटकेत

**नांदेड, ता. ७ (बातमीदार) :** नांदेड ग्रामिण पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणून दरोड्यातील तीन आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेल्या हत्यारासह एक लाख २८ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्याचबरोबर दुसऱ्या घटनेत स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कंधार पोलिस ठाण्याच्या हद्दीत पानभोसी ते नवरंगपुरा रस्त्यावर जबरी चोरी करणारे दोन आरोपी अटक केले आहेत. या आरोपींकडून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

वाजेगाव ते वसरणी भागातील रस्त्यावर सिनेमाचालक सतिश राठोड हे दुचाकीवर जात असताना खंजरचा धाक दाखवून मारहाण करून रोख रक्कम, सोन्याची अंगठी, साखळी आदी ६० हजाराचा मुद्देमाल जबरीने चोरून नेला होता. याबाबत ग्रामिण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील फौजदार आनंद बिच्चेवार आणि इतरांनी या गुन्ह्यातील आरोपींची माहिती काढली.

त्यानंतर पथकाने शोध घेऊन शेख मुखीद उर्फ मुजर शेख नईम (वय २२), शेख इलीयास शेख खदीर (वय २१) आणि सय्यद आतीक सय्यद हुसेन (वय १९, रा. तिघेही वाजेगाव, नांदेड) या तिघांना अटक केली. त्यांनी जबरी चोरी केल्याचे कबूल केले असून या गुन्ह्यात वापरलेले हत्यार तसेच दुचाकी (एमएच २६ ई ७६११) जप्त केली आहे. तसेच चोरी केलेले तीन मोबाईल, दोन सोन्याच्या अंगठ्या, एक साखळी आणि रोख दोन हजार रुपये असा एकूण एक लाख २८ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दुसऱ्या घटनेत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या पथकाने पेट्रोलिंग करत असताना एमजीएम कॉलेजजवळ एक आरोपी असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने शनिवारी (ता. सात) सचिन परमेश्वर शिंदे (वय २२, रा. बऱ्हामसिंगनगर, नमस्कार चौक, नांदेड) यास अटक केली. त्याच्याकडे विचारपूस केली असता पानभोसी ते नवरंगपुरा रस्त्यावर कारमधील चालकाकडून जबरी चोरी करून मोबाईल आणि रोख रक्कम घेतल्याचे सांगितले.

पान ४ वर »



**नांदेड :** ग्रामिण ठाण्यातील गुन्हे शोध पथकाने जबरी चोरीतील तीन आरोपींनी अटक करून त्यांच्याकडील सव्वा लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे.